E/GB/Council agenda

<u>वाचा</u>-

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (महापौर आणि उप महापौर पदांसाठी निवडणुका घेणे) मुळ नियम, 2005 मधील नियम क्रमांक 3(1) व (सुधारणा) नियम, 2006 मधील नियम क्रमांक 3 (2)
2) मा.विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश क्रमांक 2026/नपाप्र/ निवडणूक/ कावि-16 दिनांक 27.01.2026

जा.क्र./लाशमनपा/नसवि/507/2026
लातूर शहर महानगरपालिका, लातूर
(महापालिका सचिव यांचे कार्यालय)
दिनांकः-29/01/2026

**प्रति,**

**श्री./श्रीमती --------------------,**

---------------------------------

सन्मा.सदस्य/सदस्या,

लातूर शहर महानगरपालिका, लातूर

यादवारे आपणास कळविण्यात येते की, लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रीक निवडणूक 2026 नंतर महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीची पहिली विशेष सभा दिनांक 09.02.2026 रोजी सोमवार सकाळी ठिक 11.00 वाजता कै.यशवंतराव चव्हाण सभागृह येथे आयोजीत करण्यात आलेली आहे. (सभेच्या कार्यपत्रिकेची सूचना सोबत जोडलेली आहे.)

तरी आपण सदरील विशेष सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**महापालिका सचिव**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

# <u>सभा सूचना</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उप महापौर पदांसाठी निवडणुका घेणे) नियम, 2005 मधील नियम 3 (1) व (सुधारणा) नियम, 2006 मधील नियम 3 (2) अन्वये मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश क्र.2026/नपाप्र/निवडणूक/कावि दि.27/01/2026 नुसार लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 नंतरची पहिली विशेष सभा सोमवार दि.09.02.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता कै. यशवंतराव चव्हाण सभागृह येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

या विशेष सभेचे पिठासीन अधिकारी जिल्हाधिकारी, लातूर हे राहतील. सदर सभेत खालील विषयावर विचार होईल.

**<u>विषय क्र.</u>1**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उप महापौर पदासाठी निवडणुका घेणे) नियम, 2005 व (सुधारणा) नियम, 2006 मधील तरतूदीप्रमाणे निर्वाचित पालिका सदस्यामधुन महापौर व उप महापौर यांची पहिल्या पदावधीकरिता (अडीच वर्षे) निवड करणे.

1) सहसचिव नगर विकास विभाग यांची अधिसूचना क्रमांक एमसीओ-2025/प्र.क्र.422/नवि-14 दिनांक 22 जानेवारी 2026 नुसार लातूर शहर महानगरपालिका महापौर पद **"अनुसचित जाती (महिला)"** प्रवर्गासाठी राखीव आहे.

2) प्रत्येक नामनिर्देशनपत्रात उमेदवाराचे पूर्ण नाव नमूद केलेले असेल व त्यावर एका पालिका सदस्याने सुचक म्हणून व दुस-याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली असावी. कोणताही पालिका सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवाराचे नामनिर्देशनपत्रावर सुचक अथवा अनुमोदक म्हणून स्वाक्षरी करणार नाही. कोणत्याही उमेदवारास अथवा त्याचेवतीने चारपेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करता येणार नाहीत. उमेदवाराने नामनिर्देशन नगरसचिवांकडे निश्चित केलेल्या तारखेस समक्ष सादर करील.

3) महापौर व उप महापौर पदांची प्राप्त नामनिर्देशनपत्रांची छाननी, वैध उमेदवारांची नावे वर्णानुक्रमे वाचून दाखविणे, उमेदवारी मागे घेणे, निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नावे घोषित करणे ही प्रक्रिया मा.पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली विशेष सभेत होईल.

4) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उप महापौर पदासाठी निवडणुका घेणे) नियम, 2005 मधील नियम 7(3) नुसार हात वर करुन मतांची नोंद होईल. ज्यांनी ज्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले असेल अशा पालिका सदस्यांची व ज्यांनी मतदान केलेले नाही अशा पालिका सदस्यांची नावे कार्यवृत्तात नोंदविण्यात येतील.

5) नामनिर्देशनपत्रासोबत सदस्य म्हणून निवडून आल्याच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.

6) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 19(1ब) नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरीता राखीव असलेल्या महापौराच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छूक सदस्याने, नामनिर्देशनपत्रासोबत (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, 2000 च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.) (परंतु महापौर पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा

दिनांक हा (मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नागरी (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२१ (२०२२ चा महा.13) याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सुरू होणा-या आणि 31 डिसेंबर 2022 रोजी संपणा-या कालावधी दरम्यानचा असेल त्याबाबतीत ज्याने नामनिर्देशन पत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी समितीकडे अर्ज केलेले असेल परंतु नामनिर्देशन पत्र भरण्याच्या दिनांकाला ज्याला वैधता प्रमाणपत्र नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशनपत्रासोबत,

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा, आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून (सहा महिन्यांच्या) मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र सादर करील,

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने ती निवडूण आल्याच्या दिनांकापासून (सहा महिन्यांच्या) मुदतीत वैधता प्रमााणपत्र सादर करण्यास कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल.)

वरीलप्रमाणे प्रमाणपत्राच्या मूळप्रती व प्रमाणित केलेल्या सत्यप्रती नामनिर्देशन पत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.

<u>**निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे**</u>

| **अ. क्र.** | **पद** | **नामनिर्देशनपत्रे वाटप दिनांक व वेळ** | **नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा दिनांक व वेळ** | **नामनिर्देशनपत्र दाखल करावयाचे अधिकारी व ठिकाण** |
|---|---|---|---|---|
| 1 | महापौर आणि उपमहापौर | दि.03.02.2026 मंगळवार पासून | दि.05.02.2026 बुधवार स.11 ते 02 पर्यंत | महापालिका सचिव, महापालिका सचिव विभाग |

**महापालिका सचिव**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

## लातूर शहर महानगरपालिका, लातूर

## महापौर व उप महापौर या पदांसाठी निवडणूका घेणे नियम, 2005

## (अधिसूचना दि.11 फेब्रुवारी 2005)

## महापौर व उप महापौर निवडणूक कामकाज क्रम

| अ.क्र. | तपशील | नियम / पोटनियम क्रमांक | क्रम |
|---|---|---|---|
| 1 | नामनिर्देशनाची छाननी करणे व उमेदवारी मागे घेणे. | 6(2) | 1. प्राप्त नामनिर्देशनपत्राची छाननी<br>2. वैधपणे नामनिर्देशित केलेल्या सर्व उमेदवारांची नावे वाचून दाखवणे. |
| | | 6(3) | उमेदवारी मागे घेण्यासाठी 15 मिनीटाचा अवधी देणे. |
| | | 6(5) | उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नावे पालिका सदस्यांना वाचून दाखवणे. |
| 2 | **निवडणूक प्रक्रिया आणि निवडणूकीचे निकाल घोषित करणे.** | 7(1) | जर एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर, महापौरपदासाठी त्याची निवड झाल्याचे जाहीर करणे. |
| | | 7(2) | एकापेक्षा अधिक नामनिर्देशन करण्यात आली असतील तर **निवडणूक लढविणा-या उमेदवाराची नावे वर्णानुक्रमे लावणे**. |
| | | 7 (3) | निवडणूक लढविणा-या उमेदवाराचे नाव वर्णानुक्रमे घोषीत करणे आणि हात वर करुन मतांची नोंद घेणे. |
| | | 7(4) | (एक) दिलेले मत त्या उमेदवाराच्या नावासमोर योग्य रीतीने नोंदविण्यात आले असल्याची खात्री करणे.<br>(दोन) एकदा दिलेले मत बदलण्याची मुभा असणार नाही. |
| | | 7(5) | ज्यांनी मतदान केलेले नाही अशा पालिका सदस्यांच्या नावांची नोंद करणे. |
| | | 7(6) | निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास प्राप्त झालेल्या मतांची संख्या घोषीत करणे. |
| | | 7 (7) | ज्या उमेदवाराला मतदानात जास्त मते पडतील तो उमेदवार रितसर निवडून आल्याचे घोषित करणे. |
| | | 7(8) | मते समसमान मिळाल्यास निवडणूकीचा निकाल चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे ठरविणे. बहुसंख्य पालिका सदस्य ठरवतील अशा व्यक्तींकडून चिठ्ठी काढणे. |
| | | 7 (9) | ज्या उमेदवाराच्या नावाची चिठ्ठी असेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे घोषीत करणे. |